ISSN 2231-1629
Knowledge Resonance
● Vol-9 No. 2 ● July-December 2020

# बहुजन वर्गाची राष्ट्रीय परीक्षा

डॉ. मनोहर नाईक
प्राचार्य अरुणराव कालोडे महाविद्यालय,
नागपूर.

पुढील इयत्तेत जाण्याकरिता परीक्षेला बसावं लागतं. परीक्षा उत्तीर्ण करावी लागते. उत्तीर्ण होण्याकरिता परिश्रम घ्यावे लागतात. काही मोह टाळावे लागतात. ध्यास घ्यावा लागतो. अभ्यास करावा लागतो. भारतातील बहुजन वर्ग मात्र परीक्षा देणे आणि वास्तवाशी भिडणेच टाळतो आहे, हे खेदाने नमूद करावे लागते.

स्वातंत्र्यपूर्व काळात हा वर्ग असंख्य जाती–पातीत विखुरलेला होता. स्वतरूची निश्चीत ओळख नव्हती. बिनाचेहऱ्याचे अस्तित्वहीन जीवन जगत होता. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी भारतीय संविधानात समाज व्यवस्थेच्या तळाशी असलेल्या शोषित, पीडित, वंचितांना एस.सी., एस.टी., एन.टी. अशी समूह ओळख देवून या वर्गाला संघटीत व संरक्षित केले. त्याच प्रमाणे असंख्य जातींमध्ये विभागलेल्या बहुसंख्य समाजाला भारतीय संविधानात ३४० व्या कलमाच्या पाळण्यात टाकून ओ.बी.सी. असे या बिन चेहऱ्याच्या समाजाचे नामकरण केले. या समाजाला स्वतरूची ओळख व हक्क मिळवून दिले. तरीही हा समाज प्रदीर्घ काळ परंपरेची आरती गात स्वतरूच्या व आपल्या उध्दारकर्त्यांच्या ओळखी पासून अनभिज्ञ राहिला. या समाजातील शिकल्या सवरल्या लोकांना ओ.बी.सी. म्हणजे काय हे नीट समजून घ्यायला बराच काळ लागला. ज्यांना ओ.बी.सी. म्हणजे इतर मागासवर्गीय असल्याचा बोध झाला त्यांनी जाती अहंकारामुळे स्वतरूला मागासवर्गीय म्हणवून घेणे अमान्य केले. ओ.बी.सी. च्या न्याय्य हक्कांकरिता आंबेडकरवादी संघटनांनी भारतात मंडल आयोग लागू करण्याकरिता आंदोलने सुरू केली, तेव्हा थोडा धीट व विचारी ओ.बी.सी. बांधव दचकत–बिचकत रस्त्यावर उतरू लागला, हे नजरेच्या टप्प्यातील वास्तव कुणीही नाकारु शकत नाही.

भारतीय समाज जातीग्रस्त असला तरी, या समाजाचे ढोबळपणे दोन वर्गात विभाजन करता येते, आणि ते पुढील लढ्याच्या दृष्टीने योग्यही ठरते. पहिला वर्ग अभिजन आणि दुसरा वर्ग म्हणजे बहुजन. ज्यांनी शतकानुशतके देवा–धर्माच्या नावाने बहुसंख्य समाजावर सामाजिक, राजकीय, शैक्षणिक, सांस्कृतिक व आर्थिक अधिपत्य स्थापन करून सामान्यांचे शोषण केले. इतरांच्या मूलभूत अधिकारांचे हनन करून स्वतरूला विशेषाधिकारी घोषित केले ते म्हणजे अभिजन. हा अभिजन वर्ग संख्येने फार अल्प आहे. या देशात बहुसंख्य असलेला, काबाड कष्ट करणारा परंतु स्वसामर्थ्याची जाणीव–जागृती नसलेला समाज म्हणजे बहुजन समाज. हिंदू धर्मातील वर्णव्यवस्थेत या बहुसंख्य समाजाला शूद्र संबोधले. असंख्य जाती–पातीत विभागले आणि सत्ता, संपत्ती व प्रतिष्ठेपासून वंचित ठेवून शेती–मातीच्या व बलुतेदारीच्या कामाला जुंपले. बहुजन समाजाचे अज्ञान व विचारशून्यता हेच आपल्या सर्वश्रेष्ठतेचे मूलाधार आहेत हे ओळखून अभिजन वर्गाने बहुजन वर्गाला ज्ञानापासून व शिक्षणापासून कायमच दूर ठेवण्याचा प्रयत्न केला. देव–धर्म, पूजा–पाठ, यात्रा–जत्रा व सणा–वारात गुंतवले आणि हा बहुजन वर्ग धार्मिक कर्मकांडात आपली विचार शक्तीच गमावून बसला. आपल्या अधोगतीलाच प्रगती समजू लागला.

'स्वातंत्र्योत्तर भारतात या अधरूपतीत समाजाला प्रगतीची नवी दिशा दाखविण्याकरिताच डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी भारतीय संविधानात बहुजन वर्गाच्या सर्वांगीण विकासाच्या पायाभूत तरतुदी नमूद करून ठेवल्या. डॉ. बाबासाहेब आंबेडकरां प्रमाणेच महात्मा ज्योतिबा फुले, क्रांतिज्योती सावित्रीमाई फुले, छत्रपती शाहू महाराज, गाडगेबाबा, कर्मवीर भाऊराव पाटील, डॉ. पंजाबराव देशमुख इत्यादींनी देखील बहुजन वर्गाला प्रागतिक दिशा देण्याचा प्रयत्न केला. परंतु बहुजन वर्गाने हे सर्व सुधारक, क्रांतिकारक व उध्दारक धीक्कारुन आपल्या अधोगतीला कवटाळून राहणे पसंत केले, असेच एकूण या वर्गाच्या कृतिचारिर्त्यावरुन स्पष्ट होते.

'स्वातंर्त्योत्तर भारतात भारतीय संविधानाने मनुस्मृतीच्या विषमतावादी अमानुश युगाचा अस्त करून समतावादी युगाचा प्रारंभ केला. सर्वांना समान अधिकार व विकासाची समान संधी प्रदान केली. या समान संधीमुळेच खेडया–पाडयात राहणाऱ्यांची, शेती–मातीत राबणाऱ्यांची, जातिगत व्यवसाय करणाऱ्यांची, कष्टकरी–कामगारांची बहुजन वर्गातील मुले शिक्षित होवून शासकीय–निमशासकीय विभागात नोकऱ्यांवर लागली. जीवनमान बदलले, प्रतिष्ठा मिळाली, पदानुरुप अधिकार मिळाले, आर्थिक संपन्नता प्राप्त झाली. हे सर्व बदल संविधानाने घडवून आणले. याचाच या नवशिक्षित, सुस्थीर बहुजन वर्गाला विसर पडला. त्याचा जुनाच आजार उफाळून आला. आपल्या जीवनमानात झालेला आमूलाग्र बदल हा देवी–देवतांमुळे,

बाबा–बुवांमुळे, संता–महंतांमुळे घडून आला, असा निर्बुद्ध तर्क करुन पुन्हा त्याने पुरातन जाती–धर्माला व कर्मकांडाला कवटाळले. त्याच्यातला भक्तिभाव अधिक उफाळून आला. आता तो सरकारी कार्यालयात, शाळा, महाविद्यालयात नोकरीच्या ठिकाणी जाताना धर्म निष्ठेच्या व देव भक्तीच्या प्रदर्शना करिता कपाळावर गंध–टिळा लावणे, हाताला धागे–दोरे बांधणे, उपवास करणे असे अधोगामी कार्य तो अधिक जोमाने करु लागला. एवढेच नाही तर त्याने चार भिंतीतील वैयक्तिक धर्म नोकरीच्या ठिकाणी आणला. कामाच्या टेबलवर काचेखाली देवाचे चित्र ठेवले, कार्यालयाच्या पाठीमागील भिंतीवर देवाचा फोटो लावला, शासकीय कार्यालयात बहुजन बंधूच्या पुढाकाराने कार्यालयीन पूजा व सामुहिक आरती सुरु झाली. या धार्मिक कृत्याने आपण राष्ट्रीय नियमांना छेद देत आहोत याचेही भान त्याने ठेवले नाही.

'हा ओ.बी.सी. –बहुजन वर्ग खेड्यात शेती–वाडी करणारा एस. सी., एस.टी., एन.टी.च्या तुलनेत आर्थिक दृष्टया सक्षम असणारा वर्ग आहे. याच वर्गातून शिक्षण घेवून नोकरीवर लागलेल्या बहुजन वर्गाला अधिक आर्थिक संपन्नता लाभली. नोकरीमुळे शहरात, उपनगरात व तालुक्याच्या ठिकाणी मोठी पक्की घरे झालीत. घराच्या दर्शनी भागावर अमुक संतकृपा, तमुक बाबा कृपा अशी मोठी अक्षरे कोरली गेली. पुढे दुचाकी, चारचाकी गाड्या आल्यात. त्यावरही देवी–देवतांची नावे व स्टिकर चिकटले. चारचाकी गाडीत देवी–देवतांच्या प्रतिमा मंडित झाल्या. चारचाकी गाड्यांमधून सहकुटुंब तीर्थाटने सुरू झाली. लग्नकार्यात, कौटुंबिक सोहळ्यात खर्चिक धार्मिक विधींना प्राधान्य देण्यात आले. या विधीत पंडित–पुरोहितांना पूज्यनीय स्थान देण्यात आले. सढळ हस्ते दान–दक्षिणा देवून पुण्य पदरात पाडून घेणे आणि आपली विचारशक्ती गहाण टाकणे मोठ्या प्रमाणात सुरू झाले. हीच विचार शून्यता व कट्टर धार्मिकता आपल्यामुळे अल्पशिक्षित बांधवांमध्ये झिरपेल याचे भान देखील शिक्षित बहुजन बांधवांनी ठेवले नाही. शिक्षित होवूनही शिक्षणाचे व ज्ञानाचे महत्त्व या वर्गाने ओळखले नाही. शिक्षितपणाची चिन्हं आपल्या घरा–दारांवर उमटू दिली नाहीत. देखण्या, प्रशस्त घरात छोटीशी अभ्यासिका स्थापित करुन येणाऱ्या पिढीला ज्ञानाचा व पुरोगामी विचारांचा संपन्न वारसा देता आला असता. परंतु हा राष्ट्रीय विचार अव्हेरुन बहुतेक बहुजन बांधवांच्या घरी स्वतंत्र देवघरे थाटलेली दिसतात ही वास्तविकता आहे.

'बहुतेक शिक्षित बहुजन बांधवांना समाजोध्दारात व राष्ट्रविकासात महत्त्वपूर्ण योगदान देणाऱ्या राष्ट्रपुरुषांच्या जयंती–स्मृतीदिनांचे फार स्मरण नसतेय आणि देणे–घेणेही नसते. परंतु देवी–देवतांच्या, बाबा–बुवांच्या व संता–महंताच्या तिथ्या–पुण्यतिथ्या श्रध्दा पूर्वक स्मरणात असतात. भारतीय संविधानातील एखादे कलम अथवा संविधान उद्देशिकेतील एखादा महत्त्वपूर्ण शब्द पाठ नसतो. परंतु देवी–देवतांच्या आरत्या चढ–उतारांसह मुखोद्गत असतात, ही सर्वमान्य होणारी सत्यता आहे.

'एकूणच बहुजन समाजाची शैक्षणिक, आर्थिक, सामाजिक वराजकीय प्रगती भारतीय संविधानाच्या आंशिक अंमलबजावणीतून झालेली आहे. याची बहुजन वर्गाला थोडी जरी जाण असती, तर भारताचे आजचे राजकीय, सामाजिक, शैक्षणिक व सांस्कृतिक पर्यावरण फार वेगळे असते. राजकीय पटलावर बहुजन वर्ग खऱ्या अर्थाने सत्ताधीश असता. शासन, प्रशासनावर त्याचा ताबा असता. निर्णय व नीती निर्धारण प्रक्रियेत त्याचे महत्त्वपूर्ण स्थान असते. सामाजिक अभिसरणाची प्रक्रीया गतिमान होवून बहुजन वर्गाचे एकजीनसी समाजात रुपांतर झाले असते. अभ्यासक्रमातून मूल्यवर्धित शिक्षण देवून भारतीय लोकशाहीचा पाया मजबूत करता आला असता. शिक्षणाला अधिक बुद्धीवादी व विज्ञाननिष्ठ करता आले असते. बहुजन वर्गातील शिक्षण संस्था संचालकांनी शिक्षण संस्थांना देवी–देवतांची, संता–महंतांची नावे न देता राष्ट्रपुरुषांच्या नावाने शिक्षण संस्था स्थापन केल्या असत्या.

एकूणच भारतीय समाजात संविधान संस्कृतीमुळे, विचारशून्य प्रवृत्तीमुळे व धर्मांध वृत्तीमुळे हे राष्ट्रोध्दारक व सर्व कल्याण कारक चित्र साकार होऊ शकले नाही. हे खेदपूर्वक नमूद करावे लागते.

'बहुजन भगिनी हा स्वतंत्र अभ्यास विषय आहे. स्त्री खरं तर संस्कृती निर्माणाचा व संवर्धनाचा पाया आहे. ती संस्कृतीचा मूलाधार आहे. परंतु ही आंतरिक क्षमता बहुजन भगिनींनी आणि एकूणच भारतीय भगिनींनी सर्वार्थाने ओळखली असे म्हणता येत नाही. शतकानुशतके धर्मव्यवस्थेच्या गुलामगिरीत पिचूनही भारतीय स्त्रीयांनी या अमानुष व्यवस्थे विरुद्ध ब्र काढला नाही. या धर्मव्यवस्थेच्या बेडयांनाच त्या अलंकार समजत आल्या. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी भारतीय संसदेत 'हिंदू कोड बिल सादर करुन स्त्रीयांच्या समान अधिकारांकरिता आपले मंत्रिपद डावावर लावले. तेव्हा स्त्रीयांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना प्रखर विरोध करुन आपल्या गुलामगिरीचे जाहीर समर्थन केले. स्वतरूच्या गुलामगिरीचे जाहीर समर्थन करणारी जगाच्या इतिहासातील ही एकमेव घटना आहे. संवैधानिक अधिकारांमुळे भारतीय स्त्री उच्चशिक्षित होवून आज सर्वच क्षेत्रात आघाडीवर आहे. परंतु तीच्या उध्दार कर्त्या

ंविषयी आजही तीच्या मनात कृतज्ञता भाव जागल्याचे दिसत नाही. अनेक उच्चशिक्षित स्त्रीयांना भारतातील आद्य स्त्रीशिक्षिका म्हणून क्रांतिज्योती सावित्रीमाई फुले यांचे नाव स्मरत नाही. भारतात पहिली मुलींची शाळा कधी, कुठे आणि कुणी सुरू केली हे माहिती नाही. ज्यांना माहिती आहे त्यांच्या मनात फार आस्था, आदर अथवा कृतज्ञता भाव नाही. आजही सरस्वती, शारदा, दुर्गा ही भारतीय स्त्रीयांची आदर स्थाने आहेत. शासकीय–निमशासकीय कार्यालयात, शाळा, महाविद्यालयात नोकरी करणाऱ्या स्त्रीया सरस्वती पूजनात पुढाकार घेतात. नवरात्रीमध्ये नऊ दिवस ठरलेल्या रंगांच्या नवनवीन साड्या परिधान करून अनवाणी पायाने शक्तीची उपासना करतात. परंतु क्रांतिज्योती सावित्रीमाई फुलेंच्या जयंती निमित्त त्यांच्या जीवन चरित्राचे नऊ पानं वाचून ज्ञानोपासना करीत नाही, ही कृतघ्नता नव्हे तर आणखी काय म्हणायचे?

'बहुजन वर्ग शिक्षित झाला परंतु सूज्ञ झाला नाही. त्याने ज्ञानातील व अज्ञानातील फरक समजून घेतला नाही. भाकड पुराणकथांची निरर्थकता झुगारून सत्य इतिहास जाणून घेण्याचा प्रयत्न केला असता, तर खऱ्या राष्ट्र पुरुषांविषयी मनात आदरभाव जागा झाला असता.समाज परिवर्तना विषयीची तळमळ उत्पन्न झाली असती. विश्वश्रेष्ठ भारतीय संविधानाचे व संविधानाच्या शिल्पकाराचे भारताच्या इतिहासातील अभूतपूर्व योगदान आदरणीय ठरले असते. सर्व बहुजनांना संविधान दिन वंदनीय वाटला असता. राष्ट्रीय चिन्हांशी, प्रतिकांशी नाते अधिक घट्ट झाले असते. राष्ट्रीयत्वाची प्रखर ओळख म्हणून सर्वांनीच अशोकचक्र आपल्या जीवन व्यवहारात अभिमान पूर्वक मिरवले असते. अशोकचक्र अभिमानपूर्वक वापरणाऱ्यांकडे जातीय वादी दृष्टीने बघितले गेले नसते. असे बरेच मूलभूत स्वरुपाचे बदल समाज जीवनात घडून आले असते. बहुजन वर्ग खऱ्या अर्थाने शिकला असता आणि सत्याच्या जवळ आला असता तर! परंतु सत्तर वर्षांच्या प्रदीर्घ काळातही बहुजन वर्गाने या संदर्भात गंभीरतापूर्वक विचार केल्याचे दिसून येत नाही. अजूनही या वर्गाने देवा–धर्माशी, जाती–पातीशी नाते तोडून खऱ्या अर्थाने राष्ट्रीय भूमिका घेतलेली दिसत नाही. राष्ट्रीय भूमिका घेतली असती तर, निश्चितच हा समाज जागृत होवून संघटीत झाला असता. राष्ट्रविरोधी घटनांच्या व वक्तव्यांच्या विरुद्ध रस्त्यांवर उतरला असता. अनेक सत्ताधारी नेत्यांनी संविधाना विरुध्द गरळ ओकली, संविधानाची होळी केली, नागरिकतेवर प्रश्नचिन्ह उपस्थित करणारे सी.ए.ए. विधेयक संमत केले, ओ.बी.सी. जनगणना टाळण्याचा प्रयत्न झाला, बहुजनोध्दारक डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे निवासस्थान राजगृहा वर हल्ला झाला अशा अनेक घटना घडल्या तरीही हा बहुजन वर्ग या आपल्या अस्मिता विरोधी घटनांचा साधा निषेध देखील नोंदवू शकला नाही.यातून या वर्गाची मानसिकता स्पष्ट होते.

पुरोगामी चळवळीत थोडेफार सक्रीय असलेल्या काही बहुजन मित्रांशी चर्चा करताना हा विषय निघाला की, परिवर्तन एकदम होणार नाही, त्याला वेळ द्यावा लागेल...असा युक्तिवाद केला जातो. आणि समाज परिवर्तनाची अनिवार्यताच दुर्लक्षित केली जाते. बहुसंख्य असलेला बहुजन वर्ग हा विचाराने अधिक धार्मिक आहे. हे खरे असले तरी, त्याने परिवर्तनाच्या वाटेवरून चालताना आंबेडकरी समाजाचे बोट पकडले असते तर हा समाज आज कितीतरी पुढे असता.

'भारताचे राजकीय, सामाजिक, आर्थिक वर्तमान धोक्याच्या वळणावरुन पुढे जात आहे. अशा निर्वाणीच्या काळात बहुजन वर्गाने अधिक जबाबदारीने व विचारपूर्वक वागणे अत्यावश्यक आहे. परंतु अजूनही बहुजन वर्गाला जबाबदारीचे भान आलेले दिसत नाही. अजूनही हा वर्ग राष्ट्रीय भूमिका घेण्याचे टाळून देव–धर्म, पूजा–पाठ, उपास–तापास व जाती–पातीच्या त्याच त्या वर्गात कायम अनुत्तीर्ण होत राष्ट्रीय परीक्षेला बसणे टाळतो आहे. राष्ट्रीय आदर्श टाळून संता–महंतांचा अथवा जातिगत नेतृत्वाचा उदोउदो करणे म्हणजे सूर्योदया नंतरही पणतीच्या मिणमिणत्या उजेडात स्वतरूला चाच पडणे होय...!